1404872/2024/O/O JT-DIR-ROPUNE

I/265846/2024


महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा.क्र.: तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२३-२४/२०२४/ई-ऑफीस प्रणालीद्वारे

प्रति,

संचालक/प्राचार्य,

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील

सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था

पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांच्या कार्यवाहीबाबत..

संदर्भ : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र. १८/तंशिसं/ईबीसी/२०२४/४८ दिनांक ०२.०२.२०२४.

२) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२३-२४/२०२४/ई-ऑफीस प्रणालीद्वारे क्र. आय/२५९९५४/२०२४ दिनांक ०५.०२.२०२४.

३) महाडीबीटी संकेतस्थळावरील दिनांक ०९.०२.२०२४ रोजीचा डॅशबोर्ड.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणा-या शिष्यवृत्ती योजनांसाठी ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेला नाही अशा पात्र विद्यार्थ्यांकडून विहीत मुदतीच्या आत अर्ज भरुन घेण्याबाबत आपणास यापूर्वी वेळोवेळी परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेले आहे.

तसेच संदर्भ क्रमांक २ मधील परिपत्रकान्वये दिनांक ०५.०२.२०२४ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्डनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील संस्थास्तरावर प्रलंबित अर्जांची स्थितीस अनुसरुन संस्थांच्या लॉगीनमध्ये व विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जांचा निपटारा करणेबाबत कळविण्यात आले होते. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ वर्षाच्या तुलनेत २०२३-२४ या वर्षी विद्यार्थ्यांकडून कमी प्रमाणात अर्ज प्राप्त झालेले दिसून येत आहेत. याबाबत देखील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेकरिता ऑनलाईन अर्ज भरणेबाबत अवगत करुन सर्व पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी संकेतस्थळावर नोंदणी करण्यास निर्देशित करणेबाबत कळविण्यात आले होते.

**संदर्भ क्र. ३ मधील महाडीबीटी संकेतस्थळावरील दिनांक ०९.०२.२०२४ रोजीचा डॅशबोर्डनुसार अद्यापही मोठ्या प्रमाणावर अर्ज संस्थास्तरावर तसेच विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये प्रलंबित असलेबाबत दिसून येत आहे. तसेच पात्र विद्यार्थ्यांची अपेक्षित नोंदणी न झालेबाबतही दिसून येत आहे. सदर योजनांचा लाभ घेणेबाबतची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे किंवा विद्यार्थ्यांकडून नोंदणी करुन घेण्यास संस्थास्तरावर उदासीनता दिसून येत असून संस्थाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याने मा. संचालक, तंत्र शिक्षण यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे.**

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व संस्थाचालक व प्राचार्यांना **पुन:श्च** कळविण्यात येते की, महाडीबीटी संकेतस्थळावरील तंत्रशिक्षण संचालनालया अंतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांना आपल्या संस्थेतील सर्व पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांची नोंदणी दि. १५ फेब्रुवारी २०२४ पूर्वी करुन घ्यावी तसेच प्राप्त सर्व अर्जांची लगेच छाननी करुन पुढील मान्यतेस्तव या विभागीय कार्यालयाकडे महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात यावेत. या आर्थिक वर्षात सदर योजनेच्या लाभापासून कोणताही पात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास व दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत नोंदणी व छाननी अभावी पात्र विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती प्राप्त न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाचालक व प्राचार्य यांची असेल याची नोंद घ्यावी.

Signed by Maruti Rajaram Jadhav
Date: 09-02-2024 15:23:57
Reason: Approved

(मा. रा. जाधव)

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : महाडीबीटी पोर्टलवरील दि. ०९.०२.२०२४ रोजीचा डॅशबोर्ड.

प्रत :

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीस्तव.

२. प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेसाठी.

# Directorate of Technical Education, Regional Office, Pune.

DBT Dashboard [Last Report Updated: 09-02-2024 07:20:10]

**F.Y.2023-2024**

| Scheme | Application Received | Cancelled | Net Received | Rejected | Sent back to applicant | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Pending At Department |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE) | 33,622 | 3,314 | 30,308 | 7 | 4,803 | 7,008 | 18,436 | 4,364 | 2,644 |
| Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC) | 95,014 | 9,945 | 85,069 | 162 | 12,657 | 49,857 | 22,227 | 48,452 | 1,405 |
| Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE) | 3,892 | 344 | 3,548 | 4 | 348 | 1,852 | 1,342 | 1,812 | 40 |
| Total: | 132,528 | 13,603 | 118,925 | 173 | 17,808 | 58,717 | 42,005 | 54,628 | 4,089 |